


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आदिवासी कथा: संकल्पना आणि समीक्षा

डॉ.गौरव दिलीपराव अवचट
महात्मा ज्योतिबा फुले वाणिज्य,
विज्ञान व विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय,
भातकुली, जिल्हा अमरावती.

१९६० नंतर दलित साहित्य, ग्रामिण साहित्याने आपले वेगळपण सिध्द केले. नवीन आशय व अभिव्यक्ती घेवून कादंबरी, कथा, कविता, आत्मचरित्र इत्यादि साहित्य प्रकार व्यक्त झाले. दलित व ग्रामिण साहित्यानंतर आदिवासी साहित्य प्रवाहाची ओळख मराठी साहित्याने करून दिली. सुरुवातीच्या काळात बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासी जाणिवा व्यक्त केल्या. "आपला समाजही विविध जाती-जमातीची उतरंड आहे. ज्यांनी बंडखोरी केली त्यांच्या बंडखोरीलाही सतत मर्यादा पडत आलेल्या आहेत. सगळ्यात उशीरा जागृती झाली ती आदिवासींमध्ये झाली. मानव मुक्तीचा हा क्रम आहे. आणि त्याला इलाज नाही. आपल्या जातिबध्द समाजात तर तो विशेषत्वाने आहे. महाराष्ट्रात पहिल्यांदा, बंडखोरीची तुतारी फुंकली ती केशवसुतांनी. आजच्या दृष्टीने ती बंडखोरी नसेल, पण ती शंभर वर्षापूर्वीच्या काळात होती हे महत्वाचे आहे. नंतर मराठी साहित्यात फडके, खांडेकरांचे (रंजनवादी) युग आले. त्याला दलित साहित्याने जबरदस्त धक्का दिला. त्याचा पुढचा धक्का आदिवासी साहित्याने दिला पाहिजे. विधायक कामाचे महत्त्व मी मानतो, पण संघर्षाशिवाय गत्यंतर नाही. दलितांनी तो केला. आदिवासींनी तो सुरु केलेला आहे. तो त्यांना तडीस न्यावयाचा आहे. शोषितांच्या सर्व शक्ती एकवटल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत."[1] या विधानातून डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासी साहित्यिकांना एक प्रकारे आव्हान केले आहे. हाच विचार इथून पुढे निर्माण झालेल्या आदिवासी साहित्य प्रवाहामध्ये पाहायला मिळतो.

दलित साहित्यापेक्षा आपले दुःख वेगळे आहे ही जाणीव पुढे आदिवासी साहित्यिकांना येत राहिली व म्हणूनच आदिवासी साहित्याचे स्वरुप दलित साहित्यापेक्षा वेगळे आहे, याचे भान आदिवासी साहित्यिकांना आले. आपली संस्कृती व इतिहास वेगळा आहे ही बाब आदिवासी प्रवाहात व्यक्त झाली. हे भान घेवूनच येणारे आदिवासी साहित्य निर्माण झाले.

कविता, कादंबरी, कथा व एकांकीका या साहित्य प्रकारातून आपल्या संस्कृतीची व इतिहासाची नोंद आदिवासी साहित्यिकांनी घेतली. या पार्श्वभूमीवरच आदिवासींचे कथा साहित्य निर्माण झाले. दलित व ग्रामिण साहित्याने आशय व अभिव्यक्तीमध्ये केलेला बदल अनेकांसाठी प्रेरणादायी होता. ही प्रेरणा घेवून पुढे आदिवासी कथा निर्माण झाली. कथेचा आवाका कसा-कसा बदलत गेला व तो आदिवासी कथा साहित्याला कशा प्रकारे प्रेरक ठरला या विषयी डॉ. संजय लोहकरे यांचे मत पाहणे योग्य ठरले. "१९९० नंतर या देशात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले होते. जीवनमूल्यांपेक्षा, मानवी मूल्यापेक्षा, अर्थव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवले जाऊ लागले होते. शहरीकरणाने हळूहळू खेडी, तिथली जमीन, संस्कृती, भाषा गिळंकृत करण्यासाठी जबडा वासला होता. अशा वेळी आदिवासी, शिक्षण आरोग्य, कुपोषण, नक्षलवाद, सावकारशाही, धर्मांतर सारख्या प्रश्नांच्या विळख्यात अडकला होता. आदिवासींच्या जंगल संपत्तीवर सरकारी व खाजगी ठेकेदार टपून बसले होते. या सगळ्या प्रश्नांना घेवून आदिवासी लिहू, बोलू लागला होता. साहित्याच्या शस्त्राने व्यवस्थेच्या विरुध्द जमवाजमव करू लागला होता. पण तो प्रश्नांच्या खोल गर्तेत अडकल्याने लढण्याची हिंमत दाखवत नव्हता. दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणाने पेटलेला देश आणि त्यातून निर्माण झालेली अर्थव्यवस्थेची आग, तिचा धूर आदिवासी वाड्यापर्यंत येऊ लागला होता. त्याचे परिणाम आदिवासी कथेवर जाणवू लागले होते."[2] अशा प्रकारे आदिवासी कथा आपल्या कक्षा रुंदावत गेली.

प्रस्तूत शोध निबंधामध्ये १९९० नंतर निर्माण झालेले निवडक आदिवासी कथा साहित्य यांचा वाङमयीन अंगाने अभ्यास करावयाचा आहे. यासाठी खालिल कथासंग्रहांची निवड केली आहे. उषाकिरण आत्राम यांचा 'अहेर' (१९९६), 'शिकार फत्ते झाली' (२०१८), नजुबाई गावित यांचा 'नवसा भिलनीचा एल्गार' (२०१३), माधव सरकुंडे यांचा 'सर्वा' (२०००), 'तांडम' (२००१), संजय लोहकरे यांचा 'डांगाणी माणसं' (२०१५) तसेच 'राब' (२०१८), संजय लोहकरे व प्रा. यशवंत भांडकोळी संपादित 'कथाबोली' या निवडक कथा संग्रहाच्या माध्यमातून आदिवासीच्या व्यथा, त्यांचे समाजजीवन, भाषा संस्कृती, बोली इत्यादी बाबी तपासून पाहावयाच्या आहेत.

आदिवासी साहित्यामध्ये उषाकिरण आत्राम या महिला कथाकार या नात्याने महत्त्वाचे चे नाव मानले जाते. त्यांचा 'अहेर' ' व 'शिकार फत्ते झाली' असे दोन महत्त्वाचे कथासंग्रह आहेत. या दोन कथासंग्रह मिळून त्यांनी पंधरा कथा लिहील्या आहेत. त्यांच्या सर्वच पंधरा कथा आता 'शिकार फत्ते झाली' या एकाच कथासंग्रहात उपलब्ध आहेत. या पंधरा कथांपैकी 'शिकार फत्ते झाली', 'अहेर' 'बाजा', संघर्ष, 'भूक' व परिवर्तन' या कथा आदिवासी समाजजीवनाशी निगडित आहेत.

'अहेर' ही कथा जमीनदार वर्गाकडून होणाऱ्या शोषणाचा बळी पडलेल्या आदिवासी समुदायाची आहे. 'अहेर' ही नववधूचे लैंगिक शोषण करणारी समाज विघातक प्रथा व या प्रथेविरुद्ध सोमा आणि रमी यांनी केलेला उठाव या कथेत चित्रित केला आहे. अहेर देणाऱ्या सावकाराचा खूण करून ही प्रथाच येथे नष्ट केल्या जाते. अन्याया विरुद्ध आवाज उठवून दिलेला लढा या कथेत पाहायला मिळतो. 'शिकार फत्ते झाली' या कथेत 'मेसी' या छोट्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या वन अधिकाऱ्यांविरुद्ध आदिवासी बांधव एकजूट होऊन संघर्ष करतात. होळीचे निमित्त साधून दुष्ट अधिका-याचे दहन होळीत केल्या जाते. 'आज मुक्त झालो, यापुढे ही अशीच लढाई लढा रे बाबांनो' हा आत्मविश्वास या कथेतून व्यक्त झाला

आहे. 'बाजा' या कथेत वेठबिगारी प्रथेवर उषाकिरण आत्राम यांनी अचूक बोट ठेवले आहे. बाजा या मुकबधीर आदिवासी बांधवावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध 'पेन्टा' ने पुकारलेला लढा या कथेत चित्रित केला आहे. 'वेठबिगारीचा अजगर आम्ही आमच्या हातांनी ठार केला आहे.' हा दृढ निश्चय आदिवासी बांधव या कथेतून व्यक्त करतात. 'जनी' ही कथा स्त्रीचे दुय्यम स्थान, तिच्याकडे पाहण्याची भोगविलासी वृत्ती हे सगळ चित्रण विद्रोहाच्या भुमिकेतून लेखिकेने मांडले आहे. 'भूक' या कथेत अन्न मिळवण्याचा संघर्ष शेवटी भूकीमुळे विषारी कडूकंद खाण्याची येणारी वेळ व या कडू कंदामुळे झालेले मृत्यू चे तांडव, हे भीषण वास्तव वाचकांसमोर उभे राहते. 'संघर्ष' ही आदिवासी स्त्रीचे जीवन किती अनिश्चित व असुरक्षित आहे हे विदारक सत्य मांडते. सेमली या विधवा स्त्रीवर पोलीस स्टेशन मधील पोलीस बलात्कार करतात तेव्हा न्याय कुणाकडे मागायचा ? हा प्रश्न ही कथा उपस्थित करते.

उषाकिरण आत्राम यांची कथा अन्याय अत्याचार, वेठबिगारी, शोषण यांनी ग्रासलेला आदिवासी समुदाय व त्यांचा संघर्ष आपल्या समोर उभा करते.

'नवसा भिलनीचा एल्गार' हा नजुबाई गावितांचा कथासंग्रह 'जवानीमा किसबीण, धडपण मा डाकीण' 'मी ह्येर ना नदी सय' 'बांबूची मोळी' 'जानकीची सीता' 'कुतरखांब' 'भुताळ्या' आणि 'नवसा भिलणीचा एल्गार' या सात कथांच्या माध्यमातून आदिवासी विश्व उभे करते. नजूबाई गावितांच्या कथेमध्ये भील व मावची आदिवासींचे चित्रण आले आहे. त्यांची 'जवानिमा किसबीण धडपणमा डाकीण' ही कथा धुळे, नंदुरबार जिल्हातील 'डाकीण' या प्रथेवर बेतली आहे. अंधविश्वासातून स्त्रियांवर होणारा अन्याय, टोकाच्या शारीरिक यातना देणाऱ्या शिक्षा या सगळ्या समाजविघातक प्रथा या कथेत लेखिकेने मांडल्या आहे. 'मी ह्येर ना, नदी सय' ही कथा अनैतिक संबंधावर चित्रित केली आहे. तर 'बांबूची मोळी' पोटापाण्याचा प्रश्न मानवाला मृत्यू पर्यंत घेवून जातो हे सत्य मांडते. 'जानकीची सीता' ही कथा व्यसनी नव-याच्या अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रीची करूण

गाथा आहे.आपल्या मुलीवरच वाईट नजर ठेवणारा बाप, अन्याय,अत्याचार यांचे चित्रण या कथेत पाहायला मिळते. 'कुतरखांब' ही कथा प्राणी व मानवाच्या विरोधभासावर बेतली आहे. या कथेषयी प्रस्तावनेमध्ये रुपा कुलकर्णी लिहितात ''कुतरखांब ही या कथासंग्रहामधली अत्यंत चटका लावणारी गोष्ट, जो हरी वाणी गोमाला जिवंतपणी इतका त्रास देतो, खोटेपणाने त्याचे सर्वस्व हडपतो, अन्नाला मोताद करतो, तोच आपल्या कुत्र्याचा मरणानंतर मात्र त्याच्या नावाची जत्रा भरवतो. या विरोधाभासावर ही कथा लेखिकेने संपवली आहे''[3] प्राण्यांपेक्षाही मानवाकडे वाईट नजरेने पाहणारे जमीनदार या कथेत पाहायला मिळतात. 'भुतळ्या' या कथेत आदिवासींचा अंधविश्वास आपल्याच बांधवांसाठी किती घातक आहे हे सांगण्याचे धैर्य नजुबाई गावित यांनी केले आहे, तर 'नवसा भिलनीचा एल्गार' ही कथा 'नवसा' चा संघर्ष अधोरेखित करते. त्यांच्या कथेविषयी संजय लोहकरे म्हणतात. "आदिवासी संस्कृती ही मानवतावादी, स्त्री- प्रधान, न्याय, स्वातंत्र्य समता या नैसर्गिक मूल्यांवर आधारलेली संस्कृती असा एका बाजूला डांगोरा पिटला जात असताना, नजुबाई गावितांच्या कथा मात्र समाज जीवनातील या वास्तवातून स्त्रियांवर अमानवी अन्याय, अत्याचार करणाऱ्या आणि नैसर्गिक मूल्यांना पायदळी तुडवणाऱ्या असल्याचे वास्तव मांडतात, हे समजून घेणे गरजेचे आहे."[4] या विधानातून संजय लोहकरे यांनी आदिवासी समाजातील वास्तव व्यक्त केले आहे.

माधव सरकुंडे यांनी आपल्या 'सर्वा' या कथासंग्रहातून आंध आदिवासींचे समाजजीवन चित्रित केले आहे. या कथासंग्रहात 'सर्वा', डफडं', 'दीपस्तंभ' 'बरड' 'एसटी' बैगनदा' 'लुगडं' 'झड' 'बापू' 'वाट चुकलेली वस्ती' या कथाचा समावेश आहे. दारिद्र्य भूक, शिक्षण यांचा संघर्ष 'सर्वा' या कथेत पाहायला मिळतो, तर 'बरड' सारखी कथा अंधश्रध्देवर व्यक्त होते. 'दीपस्तंभ' मध्ये आदिवासी समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावणारे गोविंदराव बुचके यांचे व्यक्तिचित्रण आहे, तर 'एसटी' ही कथा गावात प्रथमच 'एसटी'

आल्यावरचा शहरी लोकांशी गावातल्या लोकांचा आलेला संपर्क वर्णन करते. एकूणच माधव सरकुंडे यांची कथा अंधश्रध्दा, दारिद्र्य जीवनसंघर्ष यांचे वास्तव उभे करते.

'ताडमं' हा त्यांचा दुसरा कथासंग्रह. या कथा संग्रहामध्ये 'ताडमं', 'मेदड', 'माय', 'तळ', 'जागल', 'काटा' 'गोटयाच्या चुली' 'मी मेलोच नाही,' 'करणी' या कथा आहेत. या कंथांच्या माध्यमातून त्यानी आदिवासी जनजीवन रेखाटले आहे. 'ताडमं' ही दत्तू व उकंड्या यांच्या संघर्षावर बेतलेली कथा आहे. गरीबीतून बाहेर येण्यासाठी आपण आपल्या बापाला साथ दिली पाहिजे व त्यांच्या संघर्षात आपण पण भाग घेतला पाहिजे हा विचार घेऊन ही कथा अवतरली आहे. 'मेदड' ही कथा मानवी प्रवृत्तीवर प्रकाश टाकते, तर 'माय' या कथेत मुलाचे स्वप्न पूर्ण करणारी कष्टकरी माय व प्रामाणिक मुलगा व त्याला मिळालेले यश अधोरेखित करते. 'तळा या कथेत कामावर येणाऱ्या मजुरांचे लैंगिक शोषण कशा प्रकारे केल्या जाते, ठेकेदाराच्या भोगविलासी वृत्तीवर ही कथा प्रकाश टाकते. 'काटा" या कथेत डॉक्टरकडे जायला उशीर होतो म्हणून आपला पाय कायमचा गमावून बसलेला दासू याची हतबलता या या कथेतून व्यक्त होते. 'गोट्याच्या चुली' या कथेमधून जीवनाची अनिश्चिता व विस्थापन हे प्रश्न लेखकाने हाताळले आहेत. 'मी मेलोच नाही' आणि 'करणी' या कथा जादुटोना, अंधविश्वास यामुळे होणारे नुकसान हा आशाय घेऊन येते.

संजय लोहकरे हे आदिवासी कथा विश्वातील एक महत्त्वाचे चे नाव आहे. 'डांगाणी माणसं' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. तर 'राब' हा त्यांचा दुसरा कथासंग्रह त्यांच्या दोन्ही कथासंग्रहाचे मराठी आदिवासी कथा साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. 'डागाणी माणसं' हा कथासंग्रह लेखकाच्या जीवनानुभवातून साकार झालेला आहे. या कथासंग्रहात येणाऱ्या कथा व पात्रे त्यांनी जवळून पाहीली आहेत. त्यांचा 'व्हयकू आजी' या कथेतून लोकवाङ्मयाचे महत्त्व अधोरेखीत होते. 'किसनाव म्हातारी' ही कथा माणुसकीचे दर्शन घडवते. 'रघुमामा ही कथा 'लय शाळा शिक पण कोणाच्या लबाड्या करु नको' असा महत्वपूर्ण जीवन विचार

देते. 'शिवाकाका' या कथेत प्राणिमात्रांवर असलेली भुतदया दिसते. 'भिमा कोल्हा,' 'गारबा', 'जागल्या भगत' 'काळू पाटील' 'काशाबाबा' 'लालबाबा', 'कलयवाला' या सगळ्या कथा माणुसकी व प्रेमाची शिकवण देणाऱ्या आहेत. 'डांगाणी' बोलीमुळे या कथासंग्रहाला भाषेच्या दृष्टिकोनातून महत्वाचे माणले जाते.

'राब' हा संजय लोहकरे यांचा दुसरा कथासंग्रह. या कथासंग्रहातल्या कथा निसर्गकेंद्री आशयद्रव्याने अभिव्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या या कथासंग्रहाला लोकगीतांचा स्पर्श झाला आहे व डांगाणी बोलीने हा कथा संग्रह बहरला आहे. 'राब' ही या कथासंग्रहातली पहिली कथा विस्थापनाच्या समस्येवर चित्रित झाली आहे. "राबणी करताना रानात आपून ऐलापैलांची झाडा तोडीतो, तेंचा किड्या मुंग्यांना, पाखरा भ्याकराली उपेग नस्तो, तशीच आपून इथं ऐलापैलाची झाडा हावोत. आपला कोणालीच उपेग नही. म्हणून इथल्या सरकारनं तोडला बिनधास आन् आपला राब घातला."[5] या संवादावरुन आदिवासी समाजाचे दुःख लेखकाने मांडले आहे. 'आवणी' ही कथा निसर्ग, शेती व निसर्गाशी असलेली आदिवासींची एकरूपता चित्रित करते. 'जीतराब' ही कथासुद्धा माणूस व पर्यावरण या समतोलावर बेतलेली आहे. 'फालिस्ट' या कथेत आदिवासींना जगंलापासून त्यांचे नाते कसे तोडले हा भावनात्मक विचार व्यक्त करते, तर 'ढोल' या कथेत आदिवासी संस्कृतीचे प्रतिबिंब दिसून येते. 'भगत' या कथेत भगत विरुद्ध शहरातला पुजारी यांच्यातला संघर्ष पाहायला मिळतो. 'सेटलमेंट' ही कथा आदिवासी व राजकारणी यांचा संघर्ष चित्रित करते. 'गायखा' या कथेत औपचारिक शिक्षण देणारी निसर्ग शाळा आपल्या जीवनात कशी महत्त्वाची भूमिका बजावते, हे पाहायला मिळते, 'जीवाबा' ही कथा आदिवासींच्या कला अविष्कारामधील चित्रकला या कलेवर बेतली आहे.

या प्रकारे संजय लोहकरे यांचा कथासंग्रह आदिवासींचे जनजीवन, त्यांच्या जगण्याच्या विविध तऱ्हा, कला, संस्कृती, निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आदिवासींचे होणारे

विस्थापन, आदिवासी समाजातील लोकगीते, लोकनृत्य, लोककथाचे अविष्कार या सगळ्या संदर्भांनी ओतपोत भरली आहे.

'कथाबोली' हा संजय लोहकरे आणि प्रा. यशवंत भांडकोळी यांनी संपादित केलेला कथासंग्रह आहे. या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे, चौदा बोलीतील निवडक कथा या संग्रहात समाविष्ट आहेत. या संपदनात कैलास धिंदळे यांनी आपल्या कथा 'ठाकरी' बोलीमध्ये लिहिल्या आहेत. त्यांच्या 'आवनी' 'बाजार' 'कारभार' 'पारध' कथांच्या माध्यमातून आदिवासी जीवनातील संघर्ष चित्रित केला आहे. 'आवनी कथेतून शासनाचा भोंगळा कारभार त्यांनी चव्हाट्यावर आणला आहे. बाजार ही कथा व्यापारी वर्गाकडून आदिवासींची होणारी फसवणूक आपल्या समोर आणते तर 'पारध' या कथेतुन प्राण्यावरील दयेचे चित्रण येते.

'कथाबोली' मध्ये देवदत्त चौधरी यांच्या 'कोकणा' बोलीतील चार कथा समाविष्ट आहेत. '७२ चा दुष्काळ', अतृप्त आत्मा', 'एकमेकात गुतलेले जीव', 'नाद' या कथेतून लेखकाने दुष्काळ पडल्यावर गरिबाचे होणारे हाल, अंधश्रध्दा, मुक्या प्राण्यांवरील प्रेम, निसर्ग जाणीव असे विविध विषय हाताळले आहेत. कथा बोलीतील 'मारुती आढळ यांनी 'मावळी' बोलीतून, तर सुनील गायकवाड यांनी 'भिलोरी' बोलीतून कथालेखन केले आहे. व्यापारी वर्गाकडून होणारी फसवणूक कृषिविषयक प्रथा, पोटासाठी करावी लागणारी शिकार, जगंल नष्ट होणारी समस्या, अंधविश्वास व माणुसकी इ. विषयांवर कथा चित्रित झाल्या आहेत. या संपादनाच्या प्रस्तावनेमध्ये संजय लोहकरे म्हणतात "मराठी साहित्यातील कथा, कादब- यांनी, आत्मकथनांनी जनसमुहाचे जीवन, त्यांचा राग, लोभ, सुख-दुखे, वेदना, संवेदन, प्रतीके, हसणे-रडणे, हे बोलीतून अधिक सकसपणे मांडले. 'बोली' हे अभिव्यक्त होण्याचे सर्वात सोपे साधन असल्याने अनेक साहित्यिक आपल्या बोलीतून अभिव्यक्त होऊ लागले."[6] या भूमिकेतूनच कथाबोली या कथासंग्रहाची निर्मिती झाली आहे.

या कथांचा अभ्यास केल्यावर खालील निष्कर्षापर्यंत आपण जावू शकतो.

## निष्कर्ष :

- आशयघन स्वरूपामुळे आदिवासी कथा अस्तित्ववादी वाटते.
- निसर्ग व आदिवासी समुदाय यांचा अनुबंध आदिवासी कथेमध्ये चित्रित झाला आहे.
- दारिद्र, भूक, शोषण, विस्थापन, वेठबिगारी, शिक्षणासाठी केलेला संघर्ष हा सगळ्या सामाजिक संदर्भ असलेल्या समस्या आदिवासी जीवनात कशा प्रकारे डोकावतात, यांचे वास्तव चित्रण आदिवासी कथाकारांनी मांडले आहे.
- आपली स्वतंत्र संस्कृती, त्यातील चालिरीती, परंपरा, सण, उत्सव यांचे आदिवासी समुदायामध्ये असलेले महत्त्व आदिवासी कथेमध्ये पाहायला मिळते.
- लोकगीते, लोककला, लोककथा, चित्रकला हे आदिवासी समुदायतले अविष्कार आदिवासी जीवनाचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे आदिवासी कथेतून चित्रित केल्या गेले आहे.
- बोलीच्या वापरामुळे कथेचा आशय अधिक संपन्न व वैशिष्ट्यपूर्ण पूर्ण झाला आहे.
- आदिवासींचे भुतकालीन जीवन व वर्तमान याचे प्रभावी चित्रण आदिवासी कथेमध्ये आले आहे.
- मानवी मूल्ये, निसर्ग जाणीवा, भूतदया, शेती संस्कृती, श्रध्दा या आदिवासी जीवनाशी निगडित विषयाला आदिवासी कथा कवेत घेवू पाहते.
- आदिवासी समाजातील लेखक असल्यामुळे वास्तवाचे भान व तळमळीने कथा लेखन झाले आहे.
- इतर साहित्यप्रकाराच्या तुलनेत संख्येने आदिवासी कथासंग्रहाचे प्रमाण अल्प आहे.

## संदर्भ ग्रंथ:

1) मुनघाटे, प्रमोद, आदिवासी मराठी साहित्यः स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन पुणे. पृ.क्र. 20.

2) लोहकरे, संजय, चळवळ आणि साहित्य, मेधा पब्लिकेशन हाऊस, अमरावती पृ.क्र. 88.

3) कुलकर्णी, रुपा, नवसा भिलणीचा एल्गार, प्रस्तावना सुगावा प्रकाशन पुणे. पृ.क्र.5

4) लोहकर, संजय, चळवळ आणि साहित्य, मेधा पब्लिकेशन हाऊस, अमरावती पृ.क्र. 93.

5) लोहकरे, संजय, राब, अथर्व पब्लिकेशन धुळे पृ.क्र. 28.

6) लोहकरे, संजय, प्रा. भांडकोळी यशवंत, कथाबोली, मेधा पब्लिकेशन हाऊस, अमरावती पृ.क्र. 7.